RNI No. MAHBIL /2009/31733



महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक १३०(२)] गुरुवार, डिसेंबर ५, २०१९/अग्रहायण १४, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २९४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

IndiaCode

विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ डिसेंबर २०१९.

अधिसूचना

ग्राम न्यायालय अधिनियम, २००८.

क्रमांक संकीर्ण-०८१६/६२५/प्र.क्र. १०१/का. ११.— ज्याअर्थी, ग्राम न्यायालय अधिनियम, २००८ (२००९ चा ४), हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्रमांक सीआरसी. २०११/प्र.क्र. १४९/का.१२, दिनांक २० जानेवारी २०१२ याद्वारे, दिनांक २२ जानेवारी २०१२ पासून जळगाव जिल्ह्यात, बोदवड तालुक्यातील बोदवड या गावी जिल्हा न्यायालय, जळगाव यांस दुय्यम असलेले एक ग्राम न्यायालय स्थापन केले आहे ;

आणि ज्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशत: फेरबदल करून आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, तसेच मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक संकीर्ण-०८१६/६२५/प्र.क्र. १०१/का. ११, दिनांक १२ जून २०१९ याद्वारे, दिनांक १६ जून २०१९ पासून बोदवड येथे नियमित न्यायालय म्हणून कार्य करण्यासाठी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय स्थापन होऊन सुरू झालेले आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बोदवड यांचे नियमित न्यायालय हे, संबंधित अधिकार क्षेत्रासाठी कार्य करीत असल्याने, महाराष्ट्र शासनास, बोदवड क्षेत्राकरिताचे ग्राम न्यायालय कार्यरत करण्याचे बंद होईल, असा निदेश देणे इष्ट वाटते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) याच्या कलमे २१, २२अ व २३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशत: फेरबदल करून आणि याबाबत त्यास समर्थ

करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून तसेच, मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक संकीर्ण-०८१६/६२५/प्र.क्र. १०१/का. ११, दिनांक १२ जून २०१९ याद्वारे, दिनांक १६ जून २०१९ पासून बोदवड येथे नियमित न्यायालय म्हणून कार्य करण्यासाठी दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर), यांचे न्यायालय स्थापन होऊन सुरू झालेले आहे ;

आणि ज्याअर्थी, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बोदवड यांचे नियमित न्यायालय हे, संबंधित अधिकार क्षेत्रासाठी कार्य करीत असल्यामुळे, महाराष्ट्र शासनास, बोदवड क्षेत्राकरिताचे ग्राम न्यायालय कार्यरत असण्याचे बंद होईल, असा निदेश देणे इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याचे कलम २१ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक १६ जून २०१९ पासून, शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक सीआरसी. २०११/प्र.क्र. १४९/का. १२, दिनांक २० जानेवारी २०१२ विखंडीत करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

यो. ही. आमेटा,
शासनाचे सहसचिव.

IndiaCode

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032
dated the 4th December 2019.

NOTIFICATION

GRAM NYAYALAYAS ACT, 2008.

No. SANKIRNA-0816/625/C.R. 101/DESK-11.— Whereas, the Government of Maharashtra, by Government Notification, Law and Judiciary Department, No. CRC. 2011/C.R. 149/DESK 12, dated the 20th January 2012 has, in exercise of the powers conferred by section 3 of the Gram Nyayalaya Act, 2008 (4 of 2009) in its application to the State of Maharashtra, and after consultation with the High Court of Judicature at Bombay, established the Gram Nyayalaya for the Village at Bodwad, sub-ordinate to the District Court of Jalgaon, in Jalgaon District with effect from the 22nd January,2012;

And whereas, the Government of Maharashtra, by Government Notification, Law and Judiciary Department, No. SANKIRNA-0816/625/C.R. 101/DESK-11, dated 12th June, 2019 has, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 11 of the Code of Criminal Procedure, 1973 (2 of 1974) and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf and of all other powers enabling in that behalf, and after consultation with the High Court of Judicature at Bombay, established, for functioning as a regular Court of Judicial Magistrate, First Class, Bodwad, with effect from the 16th June, 2019 ;

And whereas, as the regular Court of Judicial Magistrate, First Class, Bodwad, is functioning for the respective jurisdiction, the Government of Maharashtra considers it expedient to direct that the Gram Nyayalaya for village Bodwad shall cease to function from the date the Court of Judicial Magistrate, First Class, Bodwad, started functioning ;

And whereas, the Government of Maharashtra, by Government Notification, Law and Judiciary Department, No. SANKIRNA. 0816/625/C.R.101/DESK-11, dated 12th June 2019 has, in exercise of the powers conferred by sections 21, 22A and 23 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869) and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf and of all other powers enabling in that behalf, and after consultation with the High Court of Judicature at Bombay, established, for functioning as a regular Court of Civil Judge (Junior Division), Bodwad, with effect the 16th June, 2019 ;

And whereas, as the regular Court of Civil Judge (Junior Division) and Judicial Magistrate, First Class, Bodwad, is functioning for the respective jurisdiction, the Government of Maharashtra considers it expedient to direct that the Gram Nyayalaya for village Bodwad shall cease to function from the date the Court of Civil Judge (Junior Division) and Judicial Magistrate, First Class, Bodwad, started functioning ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 3 of the Gram Nyayalayas Act, 2008 (4 of 2009) read with section 21 of the General Clauses Act, 1897 (10 of 1897) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, with effect from the 16th June 2019, rescinds the Government Notification, Law and Judiciary Department No. CRC. 2011/CR 149/DESK-12, dated the 20th January 2012.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Y. H. AMETA,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.